महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

दिघी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
ई मेल&psdighi.pcpc-mh@gov.in
फोन नंबर - ०२०२९९५०६९६

जावक क्र /२०२४ दिघी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड दिनांक /०४/२०२४

## महीलेच्या खुनाचे गुन्हयातील आरोपीस तात्काळ अटक केले बाबत

आज दि २०/४/२०२४ रोजी सकाळी ०७:५५ वा चे सुमारास दिघी पोलीस स्टेशन हददीत मौजे आळंदी ता.हवेली जि.पुणे येथील इंद्रायणी नदीच्या काठी, भागेश्वरी धर्मशाळा ट्रस्ट जमीन गट नं १२७ मधील मोकळया जागेत पिंपळाच्या झाडाचे पुर्वेस कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन अंदाजे ३५ ते ४५ वयाचे अनोळखी महीलेच्या डोक्यात दगड मारुन खुन केलेला असल्याने पोलीसांनी गुन्हा रजि नं १९१/२०२४ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी हाती घेतला.

सदर गुन्हयच्या तपासात इंद्रायणी घाटावर संशयीत इसमाबाबत माहीती घेवुन संशयीत आरोपीचे रेखाचित्र काढुन घेवुन ते रेखाचित्र प्रसारीत केले असता गुन्हे शाखा युनिट ३ पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शैलेश गायकवाड व पोहवा/४७९ सानप, पोशि/१२८१ कोळेकर व पोशि/२८७७ मेरगळ असे गुन्हयाचा संमातर तपास करीत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने त्यांनी यातील संशयीत इसम नामे ज्ञानेश्वर गजानन इंगोले वय ३१ वर्ष धंदा मजुरी रा.इंद्रायणी घाट आळंदी देवाची यास मोटार सायकल नंबर एम एच १२ पीजी ५०४६ सह ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुल दिली. आरोपीकडे मिळुन आलेली मोटार सायकल बाबत चौकशी करता सदर मोटार सायकल बाबत शिक्रापुर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे मोटार सायकल चोरीस गेले बाबत गुन्हा दाखल असलयाचे निष्पन्न झाले आहे. सदर इसमास गुन्हयाचे तपासी अंमलदार विजय ढमाळ वपोनि दिघी पोलीस ठाणे याचेकडे हजर केले असता त्यांनी सखोल चौकशी केली असता नमुद इसमाने गुन्हयाची कबुली दिली. तसेच सदर इसमाचे अंगावरील कपडे रक्ताने माखलेले दिसुन आले. सदर इसमाने प्रेम भंगातुन सदर महीलेचे दुस-या इसमाबरोबर संबध असल्याचे संशयावरुन महीलेचे डोक्यात मारुन तीचा खुन केल्याचे त्यांने सांगीतले आहे. त्यानंतर तपासी अंमलदार यांनी आरोपीस दि २०/४/२०२४ रोजी २३/१० वा अटक करणेत आलेली असुन अटक आरोपीची दि २५/४/२०२४ रोजी पर्यत ५ दिवस पोलीस कस्टडी रिमांड मिळाल्याने गुन्हयाचा तसेच मृत अनोळखी महिलेची ओळख प्पटविण्याचे दृष्टीने अधिक तपास दिघी पोलीस स्टेशनचे विजय ढमाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे तपास करीत.

सदरची कारवाई मा.विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त सो, मा.वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली मा. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा, मा. डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप-आयुक्त सो, परिमंडळ ०३,

तसेच मा. सचिन हिरे, सहा. पोलीस आयुक्त सो भोसरी एमआयडीसी विभाग, मा. बाळासाहेब कोपनर सो सहा पोलीस आयुक्त सो गुन्हे शाखा यांचे सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ दिघी पोलीस ठाणे तसेच शैलेश गायकवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ३, पोहवा/४७९ सानप, पोहवा/७५५ आढारी, पोहवा/१४५६ भोसुरे, पोशि/२२९६ जेनक, पोशि/२८७७ मेरगळ, पोशि/१२८१ कोळेकर, पोशि/२००१ नांगरे, पोशि/२८८३ काळे, पोशि/२३९९ बाळसराफ, पोशि/१९४० हनमंते, पोशि/२२७३ दांगट तसेच दिघी पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक भामरे, सहा पोलीस निरीक्षक आंभोरे, पोलीस उप-निरीक्षक शिंगारे,पोलीस उप निरीक्षक रणवरे व दिघी पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे व इतर अंमलदार यांनी केला आहे.

(विजय ढमाळ)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड